International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# भारताच्या पर्यावरणीय इतिहासातील आदिवासी समाजाची भूमिका

**हांगे स्वाती रामलाल[1], प्रा. डॉ. सुधाकर वनवे[2]**

[1] *संशोधक*

[2] *मार्गदर्शक*

*Corresponding Author – हांगे स्वाती रामलाल*

**DOI - 10.5281/zenodo.17663419**

***सारांश : ( Abstract )***

*भारताचा पर्यावरणीय इतिहास समृद्ध आहे. यात आदिवासी समाजाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. आदिवासी समाजाने आपल्या पारंपरिक ज्ञान, प्रथा, लोकसंस्कृती, धार्मिक श्रद्धा आणि जीवनपद्धतीतून पर्यावरणाचे संतुलन राखले आहे. नैसर्गिक संसाधनांचे शाश्वत (Sustainable) व्यवस्थापन, जंगल संवर्धन, जैवविविधतेचे जतन, पाण्याचे नियोजन व सामुदायिक जीवनशैली ही आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये आहेत. आदिवासी समाजातील वेगवेगळ्या परंपरा , धार्मिक प्रथा, पर्यावरणीय अंदाज, जलसंधारण, निसर्गाचे त्यांच्या जीवनातील सर्वोच्च स्थान यातून आजच्या औद्योगीकरण, दळणवळण, नागरीकरण यामुळे निर्माण झालेल्या समस्येवर सुद्धा उपाययोजना करता येतात. या संशोधनात भारतातील विविध आदिवासी समाजांनी पर्यावरण संवर्धनासाठी दिलेल्या योगदानाचा अभ्यास करून त्याचे पर्यावरणीय इतिहासातील महत्त्व स्पष्ट केले आहे.*

***मुख्य शब्द : आदिवासी समाज, शाश्वत विकास, जैवविविधता, जलसंधारण.***

**प्रस्तावना :**

भारताचा पर्यावरणीय इतिहास हा समृद्ध आणि वैविध्यपूर्ण आहे. निसर्गाशी सुसंवाद राखत शतकानुशतके जगलेल्या आदिवासी समाजाने या इतिहासात मोलाचे योगदान दिले आहे. जंगल, जमीन, पाणी, वन्यजीव यांचे संरक्षण तसेच नैसर्गिक संसाधनांचा संतुलित वापर ही त्यांची जीवनपद्धती राहिली आहे. परंपरागत ज्ञान, लोकपरंपरा, धार्मिक श्रद्धा आणि प्रथांमधून आदिवासी समाजाने पर्यावरणाच्या जतनासाठी विशेष कार्य केले आहे. भारतातील सुमारे प्रत्येक प्रमुख भौगोलिक प्रदेशात आदिवासी समाजांचे समूह आढळतात - हिमालय ते पश्चिम घाट, मध्य भारत ते ईशान्य भारत, वाळवंट ते सागरी बेटे. या समुदायांनी निसर्गाशी "उत्पादन उपभोग संवर्धन" यांचा सूक्ष्म समतोल राखत जीवनपद्धती घडवली. 'निसर्ग हीच आपली देवता' या श्रद्धेवर आधारित आदिवासी समाजाने पर्यावरणीय संतुलन राखले. आधुनिक औद्योगिकरण, शहरीकरण आणि वनक्षेत्राचा ऱ्हास यामुळे पर्यावरणीय संकटे निर्माण झाली असली तरी आदिवासी समाजाने दिलेले योगदान आजही शाश्वत विकासासाठी मार्गदर्शक ठरते. त्यामुळे भारताच्या पर्यावरणीय इतिहासाचा अभ्यास करताना आदिवासी समाजाचे योगदान अधोरेखित करणे अत्याश्यक ठरते.

**उद्दिष्टे :**

1. भारताच्या पर्यावरणीय इतिहासात आदिवासी समाजाचे स्थान व योगदान स्पष्ट करणे.
2. आदिवासी समाजाच्या पारंपरिक ज्ञान, प्रथा व संस्कृतीत पर्यावरण संरक्षणाची जपणूक कशी होते हे अभ्यासणे.
3. आधुनिक विकास व शाश्वततेच्या संदर्भात आदिवासी समाजाच्या जीवनपद्धतीचे महत्त्व अधोरेखित करणे.

**गृहितके :**

1. आदिवासी समाजाची जीवनपद्धती ही निसर्गाशी सुसंवादी असल्यामुळे पर्यावरण संरक्षणास हातभार लावते.
2. पारंपरिक ज्ञान व लोकपरंपरा यांच्या माध्यमातून आदिवासी समाजाने नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर घडवून आणला आहे.
3. आधुनिक विकास प्रक्रियेमुळे आदिवासी समाजाच्या पर्यावरणीय योगदानाकडे दुर्लक्ष झाले आहे, परंतु शाश्वत विकासासाठी आदिवासी समाजाच्या पर्यावरणपूरक प्रथा आजही मार्गदर्शक ठरू शकतात.

**संशोधन पद्धती :**

1. साहित्य सर्वेक्षण (ऐतिहासिक ग्रंथ, संशोधन निबंध, अहवाल).
2. क्षेत्रीय अभ्यास (आदिवासी समाजाशी संवाद, मुलाखती, निरीक्षण).
3. तुलनात्मक अभ्यास (आधुनिक व पारंपरिक पर्यावरण व्यवस्थापन पद्धती).
4. संकलित माहितीचे विश्लेषण व निष्कर्ष मांडणे.

**अभ्यास क्षेत्र :**

या संशोधनात भारतातील विविध भागांतील आदिवासी समाजांचा विचार केला गेला आहे.

- **मध्य भारत (गोंड, भील, कोरकू)** – जंगल संवर्धन व शेतजमिनीचे नैसर्गिक व्यवस्थापन.
- **ईशान्य भारत (नागा, खासी, मिजो)** – झूम शेती, जलसंधारण, सामुदायिक वनव्यवस्थापन.
- **पश्चिम घाट (वारली, कोळी, कातकरी)** – देवराई (पवित्र वन), सामुदायिक पाणवठे.
- **हिमालयीन प्रदेश (भोटिया, लेप्चा, शेरपा)** – पर्वतीय पर्यावरणाशी जुळवून घेतलेले कृषी-वन पद्धती.

**विषयाचे महत्त्व व विश्लेषण :**

भारताच्या पर्यावरणीय इतिहासाचा अभ्यास करताना आदिवासी समाजाचे योगदान अत्यंत मोलाचे ठरते. त्यांनी वन, जल, जमीन, जैवविविधता आणि पारंपरिक ज्ञान यांच्या जतनात महत्त्वाची भूमिका निभावली आहे. म्हणूनच या योगदानाचा सविस्तर अभ्यास करणे आवश्यक आहे.

**१. ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

**पूर्व-औपनिवेशिक काळ** – स्थानिक वन, जल आणि जमिनीची संयुक्त मालकी व्यवस्था अस्तित्वात होती. सांस्कृतिक नियमांद्वारे प्रवेश व उपभोगाचे नियमन केले जाई.

**औपनिवेशिक काळ** – विविध वनकायद्यांमुळे राज्य नियंत्रण प्रस्थापित झाले. शिकार, लाकूडतोड आणि खाणकामाला चालना मिळाली. परिणामी आदिवासींचे पारंपरिक अधिकार संकुचित झाले.

**स्वातंत्र्योत्तर काळ** – वनांचे राष्ट्रीयीकरण आणि संरक्षित क्षेत्रे निर्माण करण्यात आली. त्याचबरोबर

सहभागी वनव्यवस्थापन आणि वनाधिकार मान्य करण्याचे प्रयत्नही सुरू झाले.

**समकालीन काळ** – हवामान बदल, अतिक्रमक प्रजाती आणि मोठ्या प्रकल्पांचे (धरणे, खाणी) सामाजिक-पर्यावरणीय परिणाम दिसून येतात. याला उत्तर म्हणून ग्रामशासन-आधारित वनव्यवस्थापन, पर्यावरणीय न्याय, हक्क व जबाबदाऱ्या यांचा पुनर्विचार सुरू झाला आहे.

**२. पारंपरिक ज्ञान प्रणाल्या व योगदान :**

**देवराई परंपरा** – जंगलातील काही भाग पवित्र मानून तिथे वृक्षतोड, शिकार किंवा चराईस मनाई केली जाई. शिकार, वृक्षतोड व औषधी वनस्पतींचा वापर केवळ गरजपुरता केला जातो. यातून जलस्रोतांचे संरक्षण झाले, दुर्मिळ वनस्पती व प्राण्यांचे संवर्धन झाले आणि सूक्ष्म हवामान टिकून राहिले.

**शाश्वत शेती व वनजीवन पद्धती** – स्थलांतरित शेतीमुळे जमिनीला विश्रांती मिळाली. मिश्रपीक पद्धती व मातीबंधांमुळे उत्पादनात वाढ झाली व जमिनीचा कस टिकून राहिला. अग्रोफॉरेस्ट्रीच्या माध्यमातून फळ, इंधन, चारा व औषधी वनस्पतींसह स्थानिक वाणांचे जतन झाले.

**जलसंधारण व भू-व्यवस्थापन** – पर्वतीय भागात झरे व धारांचे संवर्धन, दगडी गाळे व सूक्ष्म बंधारे बांधले गेले. कोरडवाहू प्रदेशात कंटूर बंधारे, तळी-टाके व पाण्याचा सामुदायिक वापर यांची पद्धत प्रचलित होती.

**वनौषधी व जैवविविधता ज्ञान** – आदिवासी समाजाला औषधी वनस्पतींची ओळख होती. त्यांनी काढे, लेप व तेलांचा वापर केला. ऋतुनुसार तोडीस मर्यादा होत्या. मध, गोंद, कुसुंब व केंदू यांसारख्या नॉन-टिंबर फॉरेस्ट प्रॉडक्ट्सचे शाश्वत संकलन व वितरण केले गेले.शेतीसोबत शिकार, मच्छीमारी, फळे व मुळे यांचा उपयोग करून जैवविविधतेचे संवर्धन केले जाते. औषधी वनस्पतींचे ज्ञान आधुनिक वैद्यकशास्त्रासाठी उपयुक्त ठरते.

**सांस्कृतिक-धार्मिक पर्यावरणीय नियम** – धार्मिक विश्वास व प्रथा यांमुळे पर्यावरणीय शिस्त व संरक्षण साध्य झाले.सारना पूजा', 'निसर्गपूजा' अशा धार्मिक विधीमुळे जंगलांचे संरक्षण होते.

आदिवासी नृत्य, गाणी, लोककला यात निसर्गपूजेचे दर्शन घडते.टोमेम' प्रथा (काही प्राणी, झाड, पक्षी यांना वंशाचा रक्षक मानणे) यामुळे त्यांचे संरक्षण होते.

**पारंपरिक पर्यावरणीय ज्ञान (Traditional Ecological Knowledge)** - आदिवासी समाजाला ऋतू, हवामान, पावसाचे चक्र, शेतीपद्धती याबाबत खोलवर अनुभवाधारित ज्ञान आहे. जागतिक हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर आदिवासी समाजाचा हा अनुभव धोरणनिर्मितीत महत्त्वाचा ठरू शकतो.

**३. प्रादेशिक अभ्यास :**

**पश्चिम घाट व कोकण** – देवराई व्यवस्थेमुळे जलप्रवाह जिवंत राहिले; स्थानिक समित्यांनी नियम पाळले. परिसंस्था परागीभवन करणारे कीटक, पक्षी व उभयचरांसाठी आश्रयस्थळ ठरल्या.

**मध्य भारत (गोंड, बैगा, भील)** – मिश्रपीक व फळांचे उपयोग, आगीचे नियंत्रित व्यवस्थापन, ग्रामसभा व वन समित्यांच्या माध्यमातून संकलन व व्यापाराचे नियमन.

**राजस्थान (बिष्णोई परंपरा)** – खेजडी वृक्षाचे संरक्षण; पशुधन व माती सुपीकतेचा आधार. खेजरली घटनेत वनसंवर्धनासाठी बलिदान ही परंपरा.

**ईशान्य भारत (खासी, गॅरो, नागा)** – पवित्र वने (Sacred Groves) जैवविविधतेचे कोष्टक ठरली. झूम शेतीत प्लॉट-रोटेशन व सामुदायिक संमती यामुळे जमिनीचा कस टिकून राहिला.

**हिमालय-तराई (भोटिया, वन गुज्जर)** – हंगामी स्थलांतरित पशुपालन व गवताळ परिसंस्थांचे संवर्धन.

**पश्चिम व दक्षिण भारत (वारली, कोया, तुळू, कुडुबी) –** वारली कलेत जैवस्मृतीचे दर्शन. सागरी व उपनदीय संसाधनांचा संतुलित वापर व बीज-लोकज्ञानाचे जतन.

**४. पर्यावरणीय चळवळीत आदिवासींची भूमिका :**

आदिवासी समाजाने जंगल सत्याग्रह, ग्रामस्वराज्य-आधारित वनव्यवस्थापन, नर्मदा खोरे आंदोलन यांत सक्रिय सहभाग घेतला. चिपको चळवळीसारख्या उपक्रमांना ग्रामसमुदायांचा पाठिंबा मिळाला. समुदाय वनहक्क मिळाल्यानंतर जैवविविधता नोंदवही, वनाग्नी प्रतिबंध, अवैध तोड रोखणे आणि NTFP मूल्यवर्धन यांत ठोस परिणाम दिसून आले.

**५. समकालीन धोरण व संस्थात्मक रूपरेषा :**

ग्रामसभा केंद्रित शासनामुळे संसाधनांचे नियोजन, मॉनिटरिंग व पारदर्शक लाभवाटप शक्य झाले. सहभागी वनव्यवस्थापन व वनाधिकार मान्यतेमुळे हक्क व जबाबदाऱ्या यांचा समतोल राखला जात आहे. बाजारपेठ व मूल्यसाखळी सुधारणा अंतर्गत NTFP साठी किमान आधारभाव, स्थानिक प्रक्रिया केंद्रे व महिलांसाठी बचतगट उभारण्यात आले आहे.

**निष्कर्ष : (Conclusion)**

भारताच्या पर्यावरणीय इतिहासाचा आढावा घेत असताना असे निदर्शनास येते की, यामध्ये आदिवासी समाजाचे योगदान अद्वितीय व अनमोल आहे. निसर्गाशी एकरूप होऊन जीवन जगण्याची त्यांची पद्धत आजच्या पर्यावरणीय संकटांना तोडगा देणारी ठरू शकते. शाश्वत विकास व पर्यावरणीय न्यायासाठी आदिवासी समाजाचे ज्ञान व परंपरा यांचा अभ्यास व संवर्धन करणे आवश्यक आहे.

**शिफारसी :**

1. ग्रामसभेला संसाधन व्यवस्थापनात पूर्ण स्वायत्तता द्यावी.
2. आदिवासी पारंपरिक ज्ञानाचे दस्तऐवजीकरण व कायदेशीर संरक्षण करावे.
3. जंगलातून मिळणाऱ्या गौण वनउत्पादनांसाठी (महुआ, मध, तेंदू) स्थानिक प्रक्रिया केंद्रे उभारावीत.
4. पर्यावरणीय शिक्षणात आदिवासी समाजाचे योगदान समाविष्ट करावे विद्यापीठ स्तरावर , वनविभागद्वारे उपक्रम घेऊन नागरिकांना ज्ञान देण्याचा प्रयत्न करावा.
5. मोठ्या प्रकल्पांमुळे होणाऱ्या विस्थापनात न्याय्य पुनर्वसन व सल्लामसलत (FPIC) बंधनकारक करावी.

**संदर्भ : (References)**


1. Desai, R. (2015). आदिवासी समाज आणि पर्यावरण. मुंबई: साहित्य सहवास.
2. Forest Survey of India. (2019, 2021). Forest Survey of India Reports. Ministry of Environment, Forest and Climate Change, Government of India.
3. Gadgil, M., & Gupta, A. (2005). भारतीय जैवविविधता आणि स्थानिक ज्ञान. पुणे: सृष्टी प्रकाशन.
4. Gadgil, M., & Gupte, R. (1995). पर्यावरण आणि भारत.
5. Gadkari, S. (2001). भारतीय पर्यावरणाचा इतिहास. पुणे: लोकप्रिय प्रकाशन.

6. Government of India. (2002). Biological Diversity Act. Ministry of Environment, Forest and Climate Change.
7. Government of India. (2006). The Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Rights) Act. Ministry of Tribal Affairs.
8. Gupta, R. (2002). भारतातील आदिवासी समाज.
9. Ministry of Tribal Affairs, Government of India. (Various years). Reports and Publications.
10. State Biodiversity Boards. (Various years). Reports on Sacred Groves and Community Biodiversity.
11. Sundar, N. (n.d.). Forest as Resource, Forest as Territory.
12. UNESCO. (2009). Indigenous knowledge and nature conservation.
13. Vishwanath, S. (2018). पर्यावरणीय न्याय आणि आदिवासी हक्क. नागपूर: दिग्दर्शक प्रकाशन.
14. Various NGOs & Research Institutions. (Various years). Community Forest Rights and NTFP Value Chain Studies.